## निशाणी ५ वरील आदेश

(सी.एन.आर.नं. एमएचपीयु १८-००२२४८-२०२१)

वादीने प्रस्तुत दावा वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई करिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज वादीने नि.५ वर प्रतिवादीविरुध्द 'दिवाणी प्रक्रिया संहिता' आदेश क्र.३९ नियम १ नुसार दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादींनी स्वतः अगर एजंट, नोकर चाकर इत्यादी मार्फत दावा मिळकतीची विक्री अथवा हस्तांतरण करु नये व दावा मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा कर्ज बोजा निर्माण करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत अर्जाचे कलम १ मध्ये नमुद १अ ते १ड म्हणजेच मौजे जिरेगांव येथील गट नंबर १८४, १८८, ४९२, ४९४ मधील मिळकती या दाव्याचा विषय आहे. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असुन दावा मिळकती या वादींचे आजोबा कै. नामदेव राघु यादव यांचे नावे होत्या. नामदेव राघु यादव हे दि. १३/१०/२००५ रोजी मयत झालेले असुन त्यांची पत्नी कै. इंदुबाई या दि. ०४/१२/२००३ रोजी मयत झालेल्या आहेत. कै. नामदेव यांना प्रतिवादी क्र. २ व ३ तसेच कै. अंकुश व कै. बाळु अशी चार मुले होती. कै. बाळु हे दि.०२/०२/२०१५ रोजी मयत झालेले असुन कै. अंकुश हे दि.२८/१२/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. कै. नामदेव यांच्या मृत्यु नंतर दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी त्यांच्या चारही मुलांची नावे फेरफार क्र. ७६३५ अन्वये नमुद करण्यात आली होती. कै. बाळु यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचे नावाची नोंद

फेरफार क्र. ३२६७ अन्वये सामाईकात झालेली आहे.

३. दावा मिळकत ही एकत्र कुटूंबाची असुन दावा मिळकतीचे अद्याप सरसनिरसमानाने वाटप झालेले नव्हते व नाही. कै. अंकुश यादव हे वादी क्र. १ ते ५ यांचेसोबत पुणे येथे कामानिमीत्त राहत होते. कै. अंकुश हे जिरेगांव येथे जावुन येवुन शेती करत होते व शेतीसाठी लागणारा पैसा त्यांचे गावाकडील भावंडांना पुरवत असे. असे असताना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन वादी यांचे क्षेत्र बळकावण्याच्या दृष्टहेतुने दि.१४/०९/२००६ रोजी दावा मिळकत १अ गट नंबर १८४ मधील ००हे २०आर क्षेत्र कोणताही मोबदला न घेता बिन–भरण्याचे , बिन–ताब्याचे पोकळीस्त खरेदीखत दस्त क्र. द.व.ड/३०९४/२००६ असे लिहुन घेतले आहे. सदर खरेदीखतान्वये बबन नामदेव यादव व अंकुश नामदेव यादव यांचे नावाने क्षेत्र विक्री केल्याचे दर्शवले आहे. सदर खरेदीखतामध्ये वडीलोपार्जित मिळकतीचे वाटप नसताना एकत्रीत सामाईक क्षेत्रातुन खोट्या चतुःसिमा देवुन व इतर भावांची संमती न घेता प्रस्तुत खरेदीखत नोंदवल्याचे दिसुन येते. त्यानंतर कै. अंकुश यांचे भोळ्या स्वभावाचा गैरफायदा घेवुन वाटप करावयाचे आहे असे सांगुन दि.२०/१२/२००८ रोजी खरेदीखत दस्त क्र. द.व.ड./३६८८/२००८ अन्वये गट नंबर १८८ मधील ००हे ०२आर व दि.२०/१२/२००८ रोजी गट नंबर ४९२ व ४९४ मधील क्षेत्र खरेदीखत दस्त नंबर द.व.ड./३६८७/२००८ अन्वये पोकळीस्त खरेदीखताने प्रतिवादी नंबर २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे नावे कै. अंकुश यांचेकडुन खरेदीखत करुन घेतलेले आहे. अशा प्रकारे कै. अंकुश यांना बेकायदेशीरपणे भुमीहिन करुन त्या आधारे महसुल अधिका–यांना हाताशी धरुन संगनमत करुन खरेदीखतान्वये दावा मिळकतीच्या

सातबारा सदरी नोंद केलेली आहे. सदर पोकळीस्त खरेदीखताने प्रतिवादी क्र. १ यांना दावा मिळकतीचा ताबा दिलेला नव्हता व नाही. तसेच प्रतिवादी क्र. २ यांनी दस्तामध्ये नमुद रक्कम वादी यांना दिलेली नाही. त्यामुळे सदर खरेदीखत दस्त हे मुलतः बेकायदेशीर असुन ते वादी यांच्या हिस्स्यावर बंधनकारक नाही. सदर खरेदीखतास वारसांची संमती घेतलेली नाही. कै. अंकुश यांना खरेदीखतामध्ये नमुद मिळकत विकण्या इतपत कोणतीही आर्थिक अडचण नव्हती. असे असताना कै. अंकुश यांचा दावा मिळकत ही विकण्याबाबत कधीही उद्देश नव्हता. सदरील पोकळीस्त दस्ताच्या आधारे प्रतिवादी क्र. १ यांनी नोंद असल्याचा गैरफायदा घेतला. प्रतिवादी क्र. ७ यांचेकडुन बेकायदेशीरपणे कर्ज घेतलेले आहे.

४. वादी हे दावा मिळकतीत एकत्र असणारी शेती करुन त्यांचा उदरनिर्वाह करतात. परंतु, दि.१०/०९/२०२१ रोजी वादी यांनी त्यांचा हिस्सा प्रतिवादींकडुन वाटप करुन मागितला असता त्यास प्रतिवादी यांनी नकार दिला व दावा मिळकतीमधील वादी यांचे ताबेवहिवाटीस हिल्ला हरकत करुन दावा मिळकतीची विक्री करण्याची धमकी दिली. त्यामुळे वादी क्र. १ यांनी दावामिळकती बाबत सातबारा उतारा काढुन पाहिला असता वादी क्र. १ यांचे वडीलांचे नावाची नोंद नसल्याचे दिसुन आले. त्यामुळे दावा मिळकतीच्या वाटपापुर्वी प्रतिवादी यांनी पोकळीस्त व बेकायदेशीर खरेदीखते नोंदवुन वादींचा दावा मिळकतीमधील हक्क डावलला असल्याने वादींनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतर करु नये अथवा दावा मिळकतीवर कर्ज बोजा निर्माण करु नये म्हणुन प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे.

५. प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी नि. २२ वर त्यांचे म्हणणे दाखल केले असुन त्यांनी वादीचे अर्जातील कथन नाकारले आहे. प्रतिवादी कथन करतात की, वादीने कथन केल्याप्रमाणे कै. नामदेव राघु यादव यांना बबन, शिवाजी, कै. अंकुश व कै. बाळासाहेब अशी चार मुले असुन त्यांचे पश्चात त्यांच्या चार मुलांना प्रत्येकी चार आणे हिस्सा शेत जमिनीमध्ये वारसदार म्हणुन मिळाला होता. त्यानंतर सदर चौघांनी समजुतीने व सगळ्यांच्या संमतीने त्यांच्या शेत जमिनीमधील प्रत्येकाच्या चार आणे हिशाप्रमाणे येणारे प्रत्येकाचे क्षेत्र मोजणी करुन त्याच्या चतुःसिमा निश्चीत करुन साधारणतः सन २००५–२००६ मध्ये वाटप करुन घेतलेले आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये वाटप मागण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सदर वाटप चुकीचे असते तर कै. अंकुश यांनी दावा मिळकतीचे फेरवाटप करुन मागितले असते. सन २००५–२००६ पासुन ते श्री. अंकुश यांचे दि.२८/१२/२०१५ रोजी निधन होईपर्यंत त्यांनी असे फेरवाटप करुन मागण्यासाठी कोणताही दावा दाखल केला नाही. कै.अंकुश हे त्यांची पत्नी व त्यावेळी जन्मलेले त्यांचे एका मुलीसहीत साधारणपणे सन १९८९ मध्ये दौंड तालुक्यातील त्यांचे जिरेगांव सोडुन ते पिंपरी–चिंचवड, थेरगांव येथे कायमस्वरुपी स्थायिक झालेले होते. त्यांच्या बाकीच्या मुलांचा जन्म देखील चिंचवड थेरगांव येथे झालेला होता. थेरगांव येथे त्यांनी घर बांधण्यासाठी एक प्लॉट विकत घेवुन कर्ज काढुन घराचे बांधकाम केले ते कर्ज फेडण्यासाठी कै.अंकुश यांना आर्थिक अडचण सोडविण्यासाठी पैशाची गरज होती. त्यामुळे त्यांनी जिरेगांव येथील वडीलोपार्जित शेत जमिनीतील त्यांचा हिस्सा विकला होता. प्रस्तुत दाव्यामध्ये सदर थेरगांव येथील घर मिळकत ही कै. अंकुश यांनी जिरेगांव येथील त्यांची वडीलोपार्जित शेतजमिन विकुन त्यातुन मिळालेल्या पैशामधुन बांधलेली असल्यामुळे सदर थेरगांव येथील घर मिळकत

देखील प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट करणे गरजेचे होते. कै. अंकुश यांना थेरगांव येथे कायमस्वरुपी स्थायिक होत असताना व त्यानंतर देखील त्यांच्या इतर बंधुनी विशेषतः थोरले बंधु म्हणुन श्री. बबन यादव यांनी वेळोवेळी आर्थिक मदत केलेली होती. याशिवाय कै. अंकुश यांना खरेदीखतामध्ये मोबदला म्हणुन जी रक्कम नमुद केलेली होती त्याच्या दुपटी पेक्षा जास्त पैसे प्रत्यक्षात बबन यादव यांनी दिलेले होते.

६. प्रतिवादींच्या माहितीनुसार वादी क्र. १ व ५ हे दोघे साधारपणे सन २०१९ च्या ऑगस्ट महिन्यापासुन जिरेगांव येथे भाड्याची खोली घेवुन राहण्यास आलेले आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांचा पत्ता जिरेगांव असा नमुद केलेला आहे. त्यांची जिरेगांवमध्ये स्वतःच्या मालकीहक्क व ताबेवहिवाट असलेली कोणतीही शेतजमिन अगर मालकीचे घर राहिलेले नाही. सबब वादींनी प्रतिवादींना विनाकारण दावा दाखल करुन मानसीक त्रास दिल्याने व खर्चात पाडल्यामुळे वादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

७. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एफ.के.शेख व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एच.व्ही.शहा यांचा युक्तीवाद ऐकला.

८. वादी व प्रतिवादीचे कथन व संबंधीत विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन मी खालील मूद्ये निश्चित करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २ | न्यायाचा तराजु वादीचे बाजून आहे काय? | नकारार्थी |
| ३ | तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार काय? | नकारार्थी |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्या क्र. १ ते ३

९. दावा प्रलंबित असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजुर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधीन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधीकार वापरताना खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक असते. अ) वादींना सकृतदर्शनी केस आहे का ? ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? आणि क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल का?

१०. वादी व प्रतिवादींचे कथनाचे तसेच न्यायपटलावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जिरेगांव येथील दावा मिळकत गट नंबर १८४, १८८, ४९२ व ४९४ या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती होत्या. दाव्याचे कामी दाखल दावा मिळकती संदर्भातील सातबारा उता-याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकतींच्या सातबारा सदरी सन १९७८-१९७९ पासुन कै.नामदेव राघु यादव यांचे नावाची मालक सदरी नोंद होती. त्यानंतर दि.१३/१०/२००५ रोजी कै. नामदेव यादव मयत झाल्यामुळे

फेरफार क्र. १६३५ अन्वये दावा मिळकतीस त्यांची मुले बबन,शिवाजी, कै. अंकुश व कै. बाळु यांचे नावाची वारस म्हणुन नोंद झाली. तसेच कै. बाळु दि.०२/०२/२०१६ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांची नोंद फेरफार क्र.३२६७ अन्वये सन २०१६ मध्ये दावा मिळकतीस वारस म्हणुन झालेली आहे.

११. वादी कथन करतात की, प्रतिवादींनी कै. अंकुश यांना फसवुन त्यांचेकडुन दावा मिळकती संदर्भात अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदीखत दस्त क्रमांक ३०९४/२००६, ३६८७/२००८, व ३६८८/२००८ कै. अंकुश यांना कोणतीही आर्थिक अडचण नसताना त्यांच्या दावा मिळकतीतील हिस्स्या संदर्भात प्रतिवादी क्र.१ यांचे लाभात करुन घेतले. त्यानंतर सदर खरेदीखतान्वये प्रतिवादी क्र.१ यांचे नावाची नोंद दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी मालक सदरी वेळोवेळी केलेली आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादींनी सदरचे दावा मिळकती संदर्भातील खेरदीदस्त बिनताबा, बिनभरण्याचे व पोकळीस्त करुन घेतले होते. त्यामुळे प्रतिवादी हे वादींच्या दावा मिळकतीमधील ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करुन वादींचा दावा मिळकतीमधील असलेला हक्क डावलण्याचा प्रयत्न करत आहेत.

१२. दाव्याचे कामी दाखल सदर खरेदीदस्ताचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, कै. अंकुश यांनी त्यांच्या कैटूंबिक आर्थिक अडचणी करिता दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र. १ यांना विक्री करुन खरेदीखत नोंदवले त्याच दिवशी दावा मिळकतीपैकी खरेदीखतामधील नमुद क्षेत्राचा ताबा प्रतिवादी क्र. १ यांना दिला होता. त्याचप्रमाणे दाव्याचे कामी दाखल कै. अंकुश यांच्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यांचा पत्ता सर्वे

नंबर ५/३ नम्रता हाऊसिंग सोसायटी, नखातेनगर थेरगांव पुणे असा नमुद असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी कथन करतात की, कै. अंकुश हे सन १९८९ पासुन थेरगांव पुणे येथे कायमस्वरुपी स्थायिक झाले होते. त्यानंतर त्यांना थेरगांव येथे त्यांनी बांधलेल्या घर मिळकतीसाठी काढलेल्या कर्जफेडीकरिता आर्थिक अडचण निर्माण झाली होती म्हणुन कै. अंकुश यांनी दावा मिळकती मधील त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र. १ यांना विक्री केला. दाव्याचे कामी दाखल खरेदीदस्तांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सन २००६ मधील नोंदवलेल्या खरेदीखतामध्ये लिहुन देणार म्हणुन बबन यादव यांचे देखील नाव नमुद आहे. त्याचप्रमाणे सन २००८ मध्ये नोंदवलेल्या खरेदीखतामध्ये खरेदीखतास विना–मोबदला संमती देणार म्हणुन कै. अंकुश यांचे भाऊ बबन, शिवाजी व कै. बाळु यांचे नाव नमुद आहे. त्याचप्रमाणे खरेदीखतामध्ये कै. अंकुश यांना सदर खरेदीखता संदर्भात खरेदीखतामध्ये नमुद केल्याप्रमाणे मोबदला खरेदीखत नोंदवल्या दिवशीच दिल्याचे दिसुन येते.

१३. दाव्याचे कामी दाखल कागदपत्रे तसेच वादी व प्रतिवादींच्या कथनावरुन प्रथमदर्शनी कै. अंकुश यांनी सन २००६ व २००८ मध्ये त्यांचा दावा मिळकतीमधील अविभक्त हिस्सा त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक अडचणी करिता प्रतिवादी क्र. १ यांना त्यांच्या भावांच्या संमतीने विक्री करुन खरेदीखत नोंदवल्याच्या दिवशी दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्र. १ यांना दिल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे सदर खरेदी व्यवहाराअन्वये दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी प्रतिवादी क्र. १ यांचे नावाची नोंद झाल्याचे दिसुन येते.

१४. वादी व प्रतिवादींच्या कथनाचे अवलोकन केले असता कै. अंकुश हे

दि.२८/१२/२०१५ रोजी मयत झाले असतांना त्यांचे मृत्युपश्चात त्यांची पत्नी तसेच त्यांच्या तिन मुली सज्ञान असताना दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी आजअखेर त्यांनी वारस नोंद करणे कामी कोणतीही तजबीज केलेली नाही. त्याचप्रमाणे दाव्यामध्ये नमुद खरेदीदस्त सन २००६ व सन २००८ मध्ये नोंदविले असताना कै. अंकुश यांच्या हयातीमध्ये किंवा त्यांच्या मृत्युनंतर आज अखेर वादींनी सदर खरेदीदस्ताबाबत कोठेही हरकत नोंदवलेली नाही. वादींनी अर्जामध्ये दावा मिळकतीमध्ये त्यांची ताबेवहिवाट असलेबाबत नमुद केले असले तरीही दाव्यामध्ये दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र.१ यांची दावा मिळकतीमधील ताबेवहिवाट असल्याचे दिसुन येते. दावा मिळकतीमध्ये हिस्सा असल्याचे प्रथमदर्शनी वादी यांनी सिध्द केलेले नाही. तसेच वादी यांनी दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ यांचे ताबेवहिवाटीस बेकायदेशीरपणे असलेबाबत, तसेच प्रतिवादी क्र. १ या दावा मिळकत ही हस्तांतरण करुन अथवा दावा मिळकतीवर कर्ज बोजा निर्माण करुन त्रयस्थ इसमाचे हितहक्क संबंध निर्माण करत असलेबाबत प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही.

१५. वर नमुद विवेचनावरुन वादींनी प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे दावा मिळकतीच्या ताबेवहिवटीमध्ये असलेबाबत किंवा वादी हे दावामिळकतीच्या ताबेवहिवाटीत असताना प्रतिवादी हे वादींना हरकत अडथळा करत असलेबाबत तसेच प्रतिवादी हे दावा मिळकत हस्तांतरीत करुन अथवा दावा मिळकतीवर कर्ज बोजा निर्माण करुन त्रयस्थ इसमांचे हितहक्कसंबंध निर्माण करत असलेबाबत प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादी हे

प्रतिवादींच्या प्रथमदर्शनी दिसणा–या ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. वादींचे कथना व्यतिरीक्त प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करत असलेबाबत, तसेच प्रतिवादी हे दावा मिळकत हस्तांतरीत करुन त्रयस्थ इसमांचे हितहक्क संबंध दावा मिळकतीमध्ये निर्माण करत असलेबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल नसल्याने तसा निष्कर्ष काढणे संयुक्तीक नाही. सबब वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली नाही. तसेच न्यायाच्या तुळाचे पारडे वादीच्या बाजूने झुकत आहे असे वादीने सिध्द केलेले नाही. मनाई हुकूम न दिल्यास वादींचे पैशाने भरुन न येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे हे वादीने शाबीत केले नाही. वरील सर्व बाबींचा विचारविमर्श करुन माझे प्रथमदर्शनी असे मत होत आहे की, वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४:</u>**

१६. वरिल मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षाला अनुसरुन मी खालील आदेश पारित करित आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबद्दल कोणताही आदेश नाही.

ठिकाण : दौंड :
दि. ०८/०९/२०२२

(ए.जी.कुलकर्णी)
३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

**शेरा**

मी शपथेवर सांगते की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | आर.आर.क्षिरसागर |
| कोर्टाचे नांव | :: | ए.जी.कुलकर्णी<br>३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड,<br>ता.दौंड, जि.पुणे |
| दिनांक | :: | ०८/०९/२०२२ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०८/०९/२०२२ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | १२/०९/२०२२ |